**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१५)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे १०, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L.A. BILL No. XLVI OF 2025**

A BILL

TO PROVIDE FOR CERTAIN FACILITIES AND AMENITIES TO AND ACCEPTANCE OF RESPONSIBILITY BY GOVERNMENT OF THE CHILDREN LIVING ON THE STREETS OF CITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६.**

**महाराष्ट्र राज्यातील शहरांमधील रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना विवक्षित सोयी व सुविधा पुरविण्याची आणि त्या मुलांची जबाबदारी शासनाने स्विकारण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील मोठ्या शहरात विशेषतः, मुंबई महानगरात, रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना विवक्षित सोयी व सुविधा पुरविण्याची आणि त्या मुलांची जबाबदारी शासनाने स्विकारण्याची तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(अ) " मुले " म्हणजे, ज्यांच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत आणि—

(एक) ज्यांना घर नाही. चरितार्थाचे कोणतेही दृश्य साधन नाही. किंवा

(दोन) ज्यांना आई-वडील अथवा पालक नाही, किंवा ज्यांचे आई-वडील अथवा पालक योग्य ती काळजी घेण्यास व पालकत्व पार पाडण्यास अयोग्य किंवा असमर्थ आहेत किंवा योग्य ती काळजी घेत नाहीत व पालकत्व पार पाडत नाहीत, किंवा

(तीन) जे शहरांतील रस्त्यांवर राहत आहेत, असे पुरुष व स्त्रिया ;

(ब) " आयोग " म्हणजे, कलम ४ अन्वये स्थापन करण्यात आलेला, महाराष्ट्र राज्य रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांकरिता आयोग;

(क) " पोलीस महासंचालक " म्हणजे, महाराष्ट्र राज्याचा पोलीस महासंचालक ;

(ड) "सदस्य" म्हणजे, आयोगाचा सदस्य आणि त्यात अध्यक्षाचा व सदस्य सचिवाचा समावेश आहे ;

(ई) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित.

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची काळजी व संरक्षण.

**३.** कलम २ अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या मुलांची काळजी घेण्याची व संरक्षणाची जबाबदारी राज्य शासनाकडे असेल.

आयोगाची रचना.

**४.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, " महाराष्ट्र राज्य रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांकरिता आयोग " या नावाने संबोधण्यात यावयाची एक संस्था स्थापन करील व ती संस्था या अधिनियमान्वये तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व नेमून देण्यात आलेली कर्तव्य पार पाडील.

(२) या आयोगामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(अ) अध्यक्ष, हा मुलांच्या कल्याणासाठी जिने स्वतःला वाहून घेतले आहे अशी एक मान्यवर व्यक्ती असेल ;

(ब) सहापेक्षा अधिक नसतील असे शक्यतोवर बालकल्याणाच्या क्षेत्रात काम करीत असलेले अशासकीय सदस्य ; यांचे नामनिर्देशन राज्य शासन, ज्यांनी मुलांसाठी कार्य केले आहे किंवा ज्यांना मुलांचा दर्जा उंचावण्यासंबंधीच्या बाबींच्या कायद्याचे तसेच अशा बाबींच्या प्रशासनाचे पुरेसे ज्ञान व अनुभव आहे, किंवा ज्यांनी बालकल्याणासाठी असलेल्या अथवा मुलांचे संरक्षण, त्यांचा दर्जा उंचावणे किंवा त्यांच्या सर्वसाधारण हितसंबंधाचे संवर्धन यांसाठी कार्य करणाऱ्या, मुलांसाठी असलेल्या स्वयंसेवी संघटनेचे नेतृत्व केलेले आहे अशा समर्थ, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्तींमधून करील :

परंतु, प्रत्येकी किमान एक सदस्य हा अनुक्रमे अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींमधील असेल :

परंतु आणखी असे की, अध्यक्षाचे नामनिर्देशन करण्यापूर्वी राज्य शासन, राज्यातील बालकल्याणासाठी काम करीत असलेल्या मान्यवर संघटनांशी विचारविनिमय करील,

(क) पोलीस महासंचालक हा आयोगाचा पदसिद्ध सदस्य असेल, आणि

(ड) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य-सचिव हा, राज्य नागरी सेवेत किंवा अखिल भारतीय सेवेत असलेला किंवा राज्याच्या अखत्यारितील नागरी पद धारण करणारा व समुचित अनुभव असलेला, उप सचिवाच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाचा अधिकारी असेल.

अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती.

**५.** (१) अध्यक्ष व प्रत्येक अशासकीय सदस्य तीन वर्षाच्या कालावधीसाठी पद धारण करील,

(२) अध्यक्षाला किंवा अशासकीय सदस्याला कोणत्याही वेळी, राज्य शासनाला संबोधून अध्यक्षपदाचा किंवा सदस्यपदाचा लेखी राजीनामा देता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, अध्यक्षपदावरील किंवा सदस्य पदावरील व्यक्तीला,—

(अ) ती व्यक्ती अमुक्त दिवाळखोर झाली असेल,

(ब) राज्य शासनाच्या मते ज्यात नैतिक अधःपाताचा संबंध असेल अशा अपराधासाठी ह्या व्यक्ती सिद्धापराध ठरविण्यात आले असेल व कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल,

(क) ती व्यक्ती मनोविकल झाली असेल व सक्षम न्यायालयाने तसे जाहीर केलेले असेल,

(ड) ती व्यक्ती कार्य करण्यास नकार देत असेल किंवा कार्य करण्यास असमर्थ ठरली असेल,

(ई) ती व्यक्ती आयोगाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली असेल,

(फ) राज्य शासनाच्या मते त्या व्यक्तीला त्या पदावर ठेवणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल अशा प्रकारे तिने अध्यक्ष किंवा सदस्य यांच्या पदाचा दुरुपयोग केला असेल किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पदावर राहण्यास ती अन्य प्रकारे अपात्र किंया अयोग्य ठरली असेल, तर त्या पदावरून दूर करू शकेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, त्या बाबतीतील तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय तिला या पोट-कलमान्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये किंवा अन्य कोणत्याही प्रकारे रिक्त झालेले पद, राज्य शासनाकडून, शक्य तितक्या लवकर, नवीन नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल व अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती, जिच्या रिक्त पदावर तिथे नामनिर्देशन झाले आहे त्या व्यक्तींने, ते पद रिक्त झाले नसते तर ज्या मुदतीकरता ते धारण केले असते त्या उर्वरित मुदतीकरता ते पद धारण करील :

परंतु, अध्यक्षाव्यतिरिक्त अन्य सदस्याचे पद, त्या सदस्याचा पदावधी ज्या दिनांकाला समाप्त होतो त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांत रिक्त झाल्यास, ते रिक्त पद भरण्यात येणार नाही.

(५) अध्यक्ष व सदस्य यांना कोणतेही मानधन देय असल्यास, ते मानधन व देय भत्ते आणि त्यांच्या पद धारण करण्यासंबंधीच्या इतर अटी व शर्ती या विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी.

**६.** (१) राज्य शासन, त्याच्या मते आयोगाची या अधिनियमाखालील कामे कार्यक्षमतेने पार पाडण्याकरिता आवश्यक असतील असे अधिकारी व इतर कर्मचारी यांची आयोगासाठी तरतूद करील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्ती करण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

अनुदानातून वेतन व भत्ते यांचे प्रदान करणे.

**७.** अध्यक्ष आणि सदस्य यांना देय असलेले मानधन व भत्ते आणि कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेले अधिकारी आणि इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते आणि निवृत्तिवेतन प्रशासकीय खर्च या बाबी कलम १५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानांतून भागविण्यात येतील.

रिक्त पदे इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही अवैद्य न ठरणे.

**८.** केवळ आयोगामध्ये कोणतेही पद रिक्त असल्याचा किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या किंवा अध्यक्ष अथवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नामनिर्देशनात कोणताही दोष असल्याच्या किंवा आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये, बैठक घेण्यासंबंधीची नोटीस काढण्यामधील नियमबाह्यतेसह संबंधित बाबींच्या तथ्यांवर परिणाम न करणारी. कोणतीही नियमबाह्यता असल्याच्या कारणावरून, आयोगाच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस हरकत घेता येणार नाही किंवा ती अवैध ठरणार नाही.

आयोगाने विनियमित करावयाची कार्यपद्धती.

**९.** (१) आयोग आवश्यक असेल तेव्हा आणि अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल.

(२) आयोग आपली स्वतःची कार्यपद्धती विनियमित करील.

(३) आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय, सदस्य-सचिव किंवा सदस्य-सचिवाने, यासंबंधात रीतसर प्राधिकृत केलेला आयोगाचा अन्य कोणताही अधिकारी अधिप्रमाणित करील.

आयोगाची कामे.

**१०.** (१) आयोग पुढील सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील :—

(अ) महाराष्ट्र राज्यातील सर्व मोठ्या शहरातील रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांची गणना करणे,

(ब) अशा मुलांपैकी मुलगे व मुलींना वेगवेगळ्या सामाईक निवाऱ्याची तरतूद करण्यासाठी योग्य ते उपाय योजणे,

(क) आयोगाने स्वतः किया स्वयंसेवी सामाजिक संघटनांमार्फत, समाजशास्त्रज्ञांनी अथवा सामाजिक कार्यकर्त्यांनी अशा मुलांची तपासणी करण्याची व त्यांच्या मनाची स्थिती आणि स्वभाविक प्रवृत्ती जाणून घेण्याची तरतूद करणे,

(ड) अशा मुलांना आपल्या उपजीविकेसाठी कमाई करणे शक्य व्हावे यासाठी त्यांना आयोगाने स्वतः किंवा स्वयंसेवी सामाजिक संघटनांमार्फत व्यवसाय प्रशिक्षण देण्याची तरतूद करणे,

(ई) अशा मुलांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी विशेष कार्यबलाची तरतूद करणे,

(फ) संविधान व अन्य कायदे याअन्वये मुलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे,

(ग) त्या संरक्षक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल आणि आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे :

(ह) मुलांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे,

(आय) संविधान व इतर कायदे यांच्या मुलांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवेळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे,

(जे) मुलांशी संबंधित असलेल्या, संविधानातील व अन्य कायद्यांमधील तरतुदींचा भंग झाला असेल अशा प्रकरणांमध्ये राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणांकडे दाद मागणे,

(के) पुढील गोष्टींशी संबंधित बाबींच्या तक्रारी विचारार्थ स्वीकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेणे—

(एक) मुलांचे अधिकार हिरावून घेणे,

भत्ते आणि कलम

(दोन) मुलांना संरक्षण देण्यासाठी आणि तसेच समानतेने व विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केलेल्या कायद्याची अंमलबजावणी न करणे,

(तीन) मुलांना तोंड द्याव्या लागणाऱ्या हालअपेष्टा कमी करणे आणि त्यांच्या कल्याणाची सुनिश्चिती करणे व त्यांना सहाय्य करणे या उद्देशाने घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय, घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेल्या सूचना यांचे पालन न करणे आणि अशा बाबींमधून उद्‌भवणाऱ्या प्रश्नांबाबत राज्य शासनाकडे किंवा समुचित प्राधिकरणाकडे दाद मागणे,

(ल) मुलांशी संबंधित असलेल्या, संविधानिक तरतुदींच्या किंवा अन्य कोणत्याही कायद्याच्या भंगाच्या संबंधात कोणत्याही न्यायिक मंचाकडे किंवा न्यायाधिकरणाकडे कार्यवाही सुरू करण्यासाठी गरजू मुलांना मार्गदर्शन करणे व सल्ला देणे,

(म) मुलांच्या बाबतीत करण्यात येणारा भेदभाव आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार यांमधून उद्‌भवणाऱ्या विशिष्ट समस्यांचा किंवा परिस्थितीचा विशेष अभ्यास किंवा चौकशी करण्याची मागणी करणे आणि असा भेदभाव व अत्याचार होऊ नयेत या बाबतच्या कार्यतंत्रांची शिफारस करण्यासाठी काही निर्बंध निश्चित करणे,

(न) मुलांची स्थिती सुधारण्याचे उपाय सुचवण्यासाठी उत्तेजनात्मक आणि शैक्षणिक संशोधन सुरू करणे व जागेची सोय व मूलभूत सुविधा न मिळणे, निर्वाहविषयक अपुऱ्या व्यवस्था यासारख्या त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा आणण्यास जबाबदार असलेल्या गोष्टी आणि त्यांचे काबाडकष्ट व आरोग्यविषयक धोके कमी करणारी तंत्रे शोधून काढणे ;

(ओ) मुलांच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेमध्ये सहभागी होणे व सल्ला देणे,

(पी) राज्यातील मुलांच्या विकासाच्या प्रगतीचे मूल्यमापन करणे,

(क्यू) मुलांच्या मोठ्या गटावर परिणाम करणारे प्रश्न किंवा मुलांवर परिणाम करणाऱ्या संविधानातील किंवा अन्य कोणत्याही कायद्यांतील कोणत्याही तरतुदींच्या अर्थउकलीचा प्रश्न अंतर्भूत असलेल्या पोलीस तक्रारीसह न्यायालयात गेलेल्या प्रकरणांसाठी निधी पुरवणे आणि अशा बाबींशी संबंधित अहवाल दर सहा महिन्यांनी राज्य शासनाला सादर करणे,

(आर) मुलांशी आणि विशेषतः मुले ज्या कठीण परिस्थितीत काबाडकष्ट करतात त्या विविध कठीण परिस्थितीशी संबंधित कोणत्याही बाबीबद्दल राज्य शासनाकडे नियतकालिक अहवाल पाठविणे,

(एस) या अधिनियमाची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या किंवा अन्य कोणत्याही समुचित प्राधिकरणाच्या विचारार्थ योजना तयार करणे आणि विशेषतः सोडून दिलेल्या मुलांना निर्वाह खर्च देणे, मुलांसाठी निवासाची व निवाऱ्याची व्यवस्था करणे, घरात केल्या जाणाऱ्या छळास प्रतिबंध करणे, लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करणे, मुलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करणे, मुलांचे आरोग्य व सुरक्षितता यांत सुधारणा करणे आणि मुलांना कायदेविषयक सहाय्य देणे यांच्यासंबंधीच्या कायद्यांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्यासाठी योजना तयार करणे, आणि

(टी) राज्य शासन त्याच्याकडे पाठवील अशा इतर कोणत्याही बाबी.

(२) आयोगाला कोणत्याही बाबीचा तपास करताना, खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे विशेषकरून पुढील गोष्टींच्या बाबतीतील सर्व अधिकार असतील :—

(अ) राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तपासणी करणे,

(ब) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे,

(क) शपथपत्रांवरील साक्षीपुरावा स्वीकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे,

(ई) साक्षीदारांच्या व दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे, आणि

(फ) विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

शासनाने आयोगाशी विचारविनिमय करणे.

**११.** राज्य शासन, मुलांवर परिणाम करणाऱ्या धोरणविषयक सर्व प्रमुख बाबींसंबंधात आयोगाशी विचारविनिमय करील.

तपास करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांच्या व तपास अभिकरणांच्या सेवा वापरण्याचा आयोगाचा अधिकार.

**१२.** (१) आयोगास, या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी,—

(अ) राज्याच्या, किंवा केंद्र सरकारच्या सहमतीने त्या सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा तपास अभिकरणाच्या, किंवा

(ब) अन्य कोणत्याही व्यक्तीच्या,सेवांचा वापर करता येईल.

(२) तपास करण्याच्या प्रयोजनासाठी, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही अधिकारी किंवा अभिकरण आयोगाच्या निदेशनाच्या व नियंत्रणाच्या अधीन राहून,

(अ) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी समन्स पाठवू शकेल व हजर राहण्यास भाग पाडू शकेल आणि तिची तपासणी करू शकेल,

(ब) कोणत्याही कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवू शकेल.

(३) असा अधिकारी किंवा असे अभिकरण आयोगाने दिलेल्या निदेशानुसार त्या बाबींसंबंधात तपास करील आणि त्याबाबतचा अहवाल (या कलमामध्ये यापुढे, ज्याचा निर्देश "तपास अहवाल" असा करण्यात आला आहे) आयोगाकडून या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल किंवा वाढविण्यात येईल अशा कालावधीमध्ये किंवा अशा वाढविलेल्या कालावधीमध्ये आयोगाकडे सादर करील.

स्वयंसेवी संघटनांची नोंदणी व त्यांचे सहाय्य घेणे.

**१३.** (१) मुलांसाठी असलेल्या, राज्यातील कोणत्याही स्वयंसेवी संघटनेला, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, आयोगाकडे नोंदणी करण्याची इच्छा दर्शविता येईल. आयोगास, अशा संघटनेचे समाजातील महत्त्व व भूमिका याबद्दल त्यास योग्य वाटेल अशा रीतीने त्याची स्वतःची खात्री करून घेतल्यानंतर, आयोगाच्या नोंदवहीमध्ये अशा संघटनेचे नाव दाखल करता येईल.

(२) आयोगाला, राज्यातील स्वयंसेवी संघटनांची आणि विशेषतः त्याला आपली कामे पार पाडताना ज्यांचे सहाय्य मागता येईल अशा, मुलांसाठी असलेल्या संघटनांची नोंदवही ठेवता येईल.

(३) आयोगाला त्याची कामे पार पाडीत असताना, राज्यातील कोणत्याही स्वयंसेवी संघटनांचे, विशेष करून, मुलांसाठी असलेल्या संघटनांचे सहाय्य मागता येईल.

(४) आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेल्या अशा संघटनांची सूची, कोणत्याही न्यायालयाला किंवा प्राधिकरणाला किंवा विनंतीवरून सर्वसाधारण जनतेला उपलब्ध करून देण्यात येईल.

(५) आयोगाला, त्याच्या नोंदवहीतून कोणत्याही संघटनेचे नाव लेखी नोंद करावयाच्या कोणत्याही कारणासाठी रद्द करणे योग्य वाटल्यास, अशा संघटनेला आपली बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतर आयोगाला तसे करता येईल.

(६) अशा प्रकारे नाव रद्द करण्यासंबंधीचा आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण देणे.

**१४.** या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश यानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात आयोगाच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध किंवा आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा अन्य कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या अथवा आयोगाच्या निदेशानुसार कृती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

राज्य शासनाकडून अनुदान.

**१५.** (१) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने यासंबंधातील कायद्याद्वारे रितसर विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी वापर करण्याकरिता त्यास योग्य वाटतील अशा रकमा आयोगाला राज्याच्या एकत्रीकृत निधीमधून अनुदानाच्या स्वरूपात देईल.

(२) या अधिनियमाखालील कामे पार पाडण्यासाठी आयोगाला, त्यास योग्य वाटतील अशा रकमा खर्च करता येतील आणि अशा रकमा, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

**१६.** (१) आयोग योग्य ते लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि महाराष्ट्र राज्याच्या महालेखापालाशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील अशा नमुन्यामध्ये लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील. लेखे व लेखापरीक्षा.

(२) राज्याचा महालेखापाल, तो विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतरांनी, आयोगाच्या वार्षिक लेख्यांची परीक्षा करील आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात झालेला कोणताही खर्च आयोगाकडून महालेखापालाला देय असेल.

(३) महालेखापाल आणि या अधिनियमान्वये आयोगाच्या लेख्यांची परीक्षा करण्याच्या संबंधात त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, अशा लेखा परीक्षेच्या संबंधात, महालेखापालाला सर्वसाधारणपणे शासकीय लेख्यांच्या परीक्षेच्या संबंधात जे हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार व प्राधिकार असतील आणि विशेषतः पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके व अन्य दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याचा आदेश देण्याचा आणि आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) आयोग, महालेखापालाने किंवा यासंबंधात त्याने यथोचितरीत्या नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीने प्रमाणित केलेले आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, दरवर्षी, राज्य शासनाकडे पाठवील.

**१७.** आयोग, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा पूर्ण वृत्तांत देणारा त्याचा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये व अशा वेळी तयार करील आणि त्यांची एक प्रत राज्य शासनाकडे पाठवील. वार्षिक अहवाल.

**१८.** राज्य शासन, वार्षिक अहवाल व कलम १० पोट-कलम (१), खंड (ब), (म) व (न) खालील क सर्व अहवाल, त्यांमधील राज्य शासनाशी संबंधित असतील अशा शिफारशींच्या संबंधात केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा शिफारशींमधील कोणत्याही शिफारशी स्वीकारण्यात आल्या नसल्यास, त्यासंबंधीची कारणे व लेखापरीक्षा अहवाल यासह, ते अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील. वार्षिक व इतर अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमोर मांडणे.

**१९.** आयोगाचा अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. अध्यक्ष, सदस्य, इत्यादी लोकसेवक असणे.

**२०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याकरिता राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, नियम करता येतील. या अधिनियमाच्या कोणत्या प्रयोजनांसाठी शुल्क आकारण्यासाठी, अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल. नियम तयार करण्याचे अधिकार.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा, त्याहून अधिक अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहांपुढे ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त अधिवेशनाच्या किंवा लागोपाठच्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर तो नियम त्यानंतर यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा मूळीच अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**२१.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसलेल्या तरतुदी करू शकेल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

मुले ही राष्ट्राच्या प्रगतीची चक्रे आणि आधारस्तंभ आहेत. जर शासनाने मुलांच्या निकोप वाढीकडे योग्य लक्ष दिले तर देश संपन्न आणि शक्तिशाली होईल. भारताच्या बऱ्याच भागांप्रमाणेच, महाराष्ट्र राज्यात सुद्धा, विशेषतः मुंबई, पुणे इत्यादींसारख्या महानगरामध्ये रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची अवस्था अत्यंत वाईट आहे. अधिकाधिक मुले मोठ्या शहरांच्या रस्त्यांवर गर्दी करताना दिसत आहेत. शिक्षण, व्यवसाय किंवा धंदा यांसारख्या इतर आवश्यक सुविधा दूरच राहिल्या या मुलांना ना निवारा असतो, ना कपडे किंवा योग्य अन्न मिळते. ही मुले त्यांचे जुलमी आई-वडिल/नातेवाईक यांच्या कचाट्यातून आपली सुटका करून घेण्यासाठी किंवा दारिद्र्यामुळे, अन्न व निवारा मिळेल या आशेने घर सोडून शहराकडे येतात. समाजविघातक शक्ती अशा मुलांचा वापर गुन्हेगारी कृत्यांसाठी करतात. म्हणून, अशा, रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांचे उत्तरदायित्व स्वीकारणे आणि त्यांना मूलभूत सुविधा पुरविणे योग्य होईल असे वाटते.

अशा मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या स्थिति सुधाराचे काम करण्यासाठी या विधेयकामध्ये "रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांकरिता आयोग" नावाचा आयोग प्रस्तावित करण्यात आला आहे.

म्हणून, हे विधेयक मांडण्यात आले आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे,२०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

खंड ५ व खंड ६ अन्वये रस्त्यांवर राहणाऱ्या राज्यातील मुलांसाठी स्थापन करावयाच्या आयोगाचे अध्यक्ष व सदस्य तसेच अधिकारी व इतर कर्मचारी यांना मानधन व भत्ते देण्याची तरतूद करण्यात आली आहे. आयोगावरील उपरोक्त नमूद संबंधितांच्या मानधन व भत्त्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीमधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (३).**—राज्य **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार राज्य शासनाला या खंडाद्वारे प्रदान करण्यात आला आहे.

**खंड ४ (१).—राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांसाठी आयोग स्थापन करण्याचा अधिकार राज्य शासनास या खंडाद्वारे प्रदान करण्यात आला आहे.

**खंड ५ (५).**—आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांना मानधन व भत्ते देण्याचा अधिकार राज्य शासनाला या खंडाद्वारे प्रदान करण्यात आला आहे.

**खंड ६ (२).**—आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांना मानधन व भत्ते देण्याचा अधिकार राज्य शासनाला या खंडाद्वारे प्रदान करण्यात आला आहे.

**खंड १० (२).**—या खंडाद्वारे, आयोगाला, दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार वापरण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

**खंड १६ (१).**—या खंडाद्वारे, आयोगाने तयार केलेल्या लेख्याची परीक्षा करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आला आहे.

**खंड १७.**—या खंडाद्वारे, वार्षिक अहवाल तयार करण्याचे आणि ते सादर करण्याचे निदेश आयोगाला देण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आला आहे.

**खंड २०.**—या खंडाद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम तयार करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आला आहे.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.